नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७५ Issue - 175 | वार मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४ Blow- Tuesday Date 12 November 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### राज्यात आतापर्यंत ४९४ कोटींची संपत्ती जप्त; मुंबई उपनगरात सर्वाधिक मालमत्ता जप्त

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांवर प्रभाव पाडणारी दारू, पैसे, अमली पदार्थ, मौल्यवान वस्तूंचा सुमारे ४९४ कोटींची संपत्ती आतापर्यंत जप्त करण्यात आली आहे. मंगळवारी मुंबईत दहिसर येथे दीड कोटींचे सोने जप्त करण्यात आले.

निवडणुकीत मतदारांना प्रलोभने दाखविण्यासाठी राजकीय पक्षांकडून अनेक क्लृप्त्या केल्या जात आहेत. मतदारांना पैसे, दारू, मौल्यवान वस्तूंचे वाटप करण्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी तर मतदारांपर्यंत रसद पुरवण्यासाठी पोलिसांच्या गाड्यांचा वापर केला जात असल्याचा आरोप महायुतीवर केला होता. पवार यांचा आरोप आणि राज्यात उघडकीस येत असलेल्या घटनांची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने राज्यात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी गेल्याच आठवड्यात रुग्णवाहिका, पोलिसांच्या गाड्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांच्या कारवाया वाढल्या असून मंगळवारी थेट प्रचार दौऱ्यावर असलेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हेलिकॉप्टरही तपासण्यात आले.

## सीआरपीएफच्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये सातत्याने हिंसाचाराच्या घटना समोर येत आहेत. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यू देखील झाल्याच्या घटना गेल्या वर्षभरात समोर आलेल्या आहेत. आता मणिपूरमध्ये सीआरपीएफच्या जवानांनी दहशतवाद्यांच्या विरोधात मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. जिरीबाम भागात सीआरपीएफच्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाल्याचे वृत्त समोर आले आहे.



सीआरपीएफच्या जवानांनी केलेल्या कारवाई दरम्यान दोन जवानही गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, काल दहशतवाद्यांनी काही दुकानांना आग लावली होती. तसेच त्यांनी काही घरांवर आणि सीआरपीएफ कॅम्पवरही हल्ले केले होते. यानंतर सीआरपीएफच्या जवानांकडून दहशतवाद्यांच्याविरोधात कारवाईची मोहिम राबवण्यात आली. यावेळी सीआरपीएफ जवानांनी केलेल्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाले आहेत.

दरम्यान, सीआरपीएफच्या कारवाईत मारल्या गेलेल्या संशयित अतिरेक्यांचे मृतदेह बोरोबेकरा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. याबरोबरच काही नागरिक बेपत्ता असून अतिरेक्यांनी त्यांचं अपहरण केलं आहे की जवानांच्या कारवाईमुळे ते नगरिक लपून

### कारवाईत दोन जवान गंभीर जखमी

बसले आहेत याची माहिती घेतली जात असल्याचं अधिकाऱ्यांनी माहिती देताना म्हटलं आहे. सशस्त्र दहशतवाद्यांनी बोरोबेकरा उपविभागातील अनेक दुकाने पेटवून दिल्याने जिरीबाम परिसरात तणाव निर्माण झाला होता. जूनपासून या भागात सातत्याने हिंसाचाराच्या घटना समोर येत आहेत. आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारा, दहशतवाद्यांनी बोरोबेकरा पोलिस ठाण्यावर गोळीबार केला. यानंतर ते जाकुराडोर करोंग भागात गेले. त्या ठिकाणी त्यांनी आग लावली. यानंतर दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली, त्यामुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला.

मणिपूरमध्ये अनेक दिवसांपासून हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. मणिपूरमधील परिस्थिती नियत्रंणात आणण्यासाठी भारतीय लष्कराच्या जवानांना देखील काही दिवस तैनात करण्यात आलं होतं. त्यानंतर काही ठिकाणी परिस्थिती पूर्व पदावर येत असतानाच आता पुन्हा एकदा काही ठिकाणी गोळीबाराच्या घटना घडत असल्याचं समोर येत आहे.

## सरन्यायाधीश म्हणून न्यायाधीश संजीव खन्ना यांनी घेतली शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: मतदानयंत्रांच्या वैधतेवर तसेच कलम ३७० हटवण्यावर शिक्कामोर्तब करणाऱ्या निकालापासून ते निवडणूक रोखे योजना रद्द करण्यापर्यंतच्या अनेक महत्त्वपूर्ण निकालांवर आपली छाप असलेले न्यायाधीश संजीव खन्ना (वय६४) यांनी देशाचे ५१वे सरन्यायाधीश म्हणून सोमवारी शपथ घेतली.

दिल्लीस्थित प्रतिष्ठित वकील घराण्यातील, तिसऱ्या पिढीचे वकील असलेले न्या. संजीव खन्ना हे दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश देव राज खन्ना यांचे पुत्र आणि सर्वो



च्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश एच. आर. खन्ना यांचे पुतणे आहेत. न्यायदानाचा वेग वाढवून प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याला त्यांचे प्राधान्य आहे. त्यांचे पुर्वासुरी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी १७ ऑक्टोबर रोजी या पदासाठी न्या. संजीव खन्ना यांच्या नावाची शिफारस केली होती. न्या. खन्ना यांना पदावर सहा महिन्यांचा कार्यकाळ मिळणार असून १३ मे, २०२५ रोजी ते निवृत्त होतील. न्या. संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे, १९६० रोजी झाला. त्यांनी दिल्ली विद्यापीठातील कॅम्पस लॉ सेंटरमध्ये कायद्याचे शिक्षण घेतले. त्यानंतर, १९८३मध्ये दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य म्हणून नोंदणी केली. जिल्हा न्यायालये, दिल्ली उच्च न्यायालयात दीर्घकाळ वकिली केली. प्राप्तिकर खात्यासाठी वरिष्ठ वकील, दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्राचे स्टँडिंग कौन्सेल, तसेच दिल्ली उच्च न्यायालयात अनेक फौजदारी प्रकरणांत अतिरिक्त सरकारी वकील तसेच अमायकस क्युरी म्हणून त्यांनी युक्तिवाद केला. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे ते कार्यकारी अध्यक्ष होते.

कॉलेजियमच्या शिफारशीनुसार २०१९मध्ये अनेक ज्येष्ठ न्यायाधीशांना डावलून सर्वोच्च न्यायालयावर त्यांची नियुक्ती केल्यानंतर वाद निर्माण झाला होता. ही नियुक्ती लहरी, अन्याय्य असल्याची टीका देशातील वकिलांची सर्वोच्च संघटना, बार कौन्सिल ऑफ इंडियाने केली होती. सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश संजय किशन कौल यांनी तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली होती.

## उद्धव ठाकरेंनंतर अमोल कोल्हेंच्या बॅगची तपसाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत पाहायला मिळत असून सध्या विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचारसभा पार पडत आहेत. दरम्यान, अशाच एका प्रचारसभेसाठी जाताना वणी येथे उद्धव ठाकरे यांची बॅग तपासण्यात आली. यावरून आधीच राजकीय वातावरण तापू लागलं असताना आता महाविकास आघाडीच्या आणखी एका नेत्याची बॅग तपाण्यात आल्याचे पुढे आलं आहे. उद्धव ठाकरे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार अमोल कोल्हे यांची बॅग तपासण्यात आली आहे. आमदार अमोल कोल्हे यांनी एक्स समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. तसेच त्यांनी या घटनेचा व्हिडीओ देखील शेअर केला.

आज पुन्हा एकदा बॅग तपासली गेली, विधानसभा निवडणुकीदरम्यान दुसऱ्यांदा ही तपासणी झाली. आजच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचीही बॅग तपासण्यात आली. नियम असतात हे मान्य आहे, पण नियम फक्त विरोधी पक्षांनाच असतात अन् सत्ताधाऱ्यांना सगळीकडे मोकळं रान असतं हे मान्य नाही. कायदा आहे, तर तो समानच असला पाहिजे,



अशी संतप्त प्रतिक्रिया अमोल कोल्हे यांनी दिली.

दरम्यान, महाविकास आघाडीतील शिवसेना उबाठाचे उमदेवार संजय देरकर यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे हे सोमवारी वणी येथे हेलिकॉप्टरने दाखल झाले होते. येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात हेलिपॅडवर ते उतरले. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी उद्धव ठाकरे यांचे स्वागत करत असताना तेथे अचानक काही पोलीस व निवडणूक विभागाचे तपासणी पथक दाखल झाले. त्यांनी उद्धव ठाकरे व त्यांच्यासोबत हेलिकॉप्टरने आलेल्या व्यक्तींच्या बॅगा तपासायच्या असल्याचे सांगितले. या प्रकाराने हेलिपॅडवर काही काळ गोंधळ उडाला. महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकाराला विरोध केला.

## येत्या काही दिवसात राज्यात थंडीचा जोर वाढणार, हवामान खात्याचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्याच्या बहूतांश जिल्ह्यातील कमाल आणि किमान तापमानाचा पारा घसरला आहे. राज्यात थंडीची चाहूल लागल्याचे संकेत या घसरणाऱ्या तापमानाच्या पाऱ्याने दिले आहेत. तर येत्या काही दिवसात राज्यात थंडीचा जोर वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला आहे.

थंडीने यंदा चांगलीच प्रतिक्षा करायला लावली. मोसमी पावसाचे आगमन आणि परतीचा प्रवास वेळेत झाला असला तरीही अवकाळी पावसाने थंडीचे गणित बिघडवले. परिणामी पावसाळ्यानंतरही नागरिकांना उकाडा सहन करावा लागला. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेले नागरिक थंडीची वाट पाहात होते, पण ही प्रतिक्षा आता लवकरच संपणार आहे. राज्यातील नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील तापमानात सर्वाधिक घसरण झाली आहे.



तर जळगाव, सांगली, नागपूर या जिल्ह्यात देखील तापमानात बऱ्याच प्रमाणात घट झाली आहे. तापमानाचा पारा घसल्याने हुडहुडी वाढली आहे. दरम्यान, हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस राज्यातील हवामान कोरडे राहील. तर पुढील चार दिवस विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. १५ नोव्हेंबरनंतर संपूर्ण राज्यात थंडी पडण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात रात्री व पहाटेच्या हवेत गारवा जाणवत आहे. त्यामुळे गुलाबी थंडीची चाहूल लागली असली तरीही हुडहुडी भरवणाऱ्या थंडीची मात्र प्रतिक्षाच आहे.


राज्यात पुण्यातील किमान तापमानात वेगाने घसरण होत आहे. त्यामुळे पुणेकर थंडी अनुभवत आहेत. या तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मराठवाड्यात देखील चांगलीच थंडी जाणवू लागली आहे. येथेही किमान तापमान १५ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. कोकण विभाग आणि विदर्भातील हवामान मात्र पुढील काही दिवस कोरडेच असणार आहे. दरम्यान विदर्भाची राजधानी आणि महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात कालपासून ढगाळ वातावरण आहे. येथेही कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअसच्या जवळ तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअसच्या जवळपास आहे. राज्यातील नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये देखील किमान तापमानात सर्वाधिक घट नोंदविण्यात आली आहे.

त्यामुळे याठिकाणी थंडीचा जोर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे याठिकाणी हुडहुडी भरवणारी थंडी नागरिकांना लवकरच अनुभवायला मिळेल. तर हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार १५ नोव्हेंबरपासून थंडीत वाढ होणार असल्याने हुडहुडी भरवणारी थंडीसाठी आणखी काही दिवस प्रतिक्षा करावी लागणार आहे. दरम्यान या बदललेल्या वातावरणामुळे सर्दीसारख्या आजारात वाढ झालेली आहे.

## ‘व्होट जिहाद’विरोधात ‘मतांचे धर्मयुद्ध’ पुकारावे ; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ‘व्होट जिहाद’ला प्रत्युत्तर देण्यासाठी ‘मतांचे धर्मयुद्ध’ पुकारावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी जोगेश्वरी (प.) येथील प्रचार सभेत केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मतांसाठी लाचार झाले. आम्ही हार पत्करू, पण कधीही लाचार होणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. गोरेगाव येथील भाजप उमेदवार विद्या ठाकूर आणि वर्सोवा येथील उमेदवार भारती लव्हेकर यांच्या प्रचारासाठी फडणवीस यांची सभा जोगेश्वरी (प.) येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी ठाकरे यांच्यावर कठोर टीका केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना ‘जनाब बाळासाहेब ठाकरे’ म्हटलेले खपवून घेणार नाही. आम्ही कोणत्याही जाती धर्माविरोधात नाही. पण मतांसाठी लांगूलचालन चालू देणार नाही, असे सांगून फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजीराजे यांनी औरंगजेबाला महाराष्ट्राच्या मातीत गाडले, हे औरंग्याच्या कबरीवर फुले टाकणाऱ्यांनी लक्षात ठेवावे. वक्फ बोर्डाला एक हजार कोटी रुपये, काझींचे वेतन सरकारने द्यावे, मुस्लिमांना १० टक्के आरक्षण आदी उलेमांनी केलेल्या १७ मागण्या देशहिताच्या नाहीत. काँग्रेस, शरद पवार व ठाकरे यांना हे सर्व काही चालत असेल, पण आम्ही सहन



करणार नाही. कृष्णाने महाभारतात सांगितल्याप्रमाणे विजय हा सत्याचाच होईल. ही लढाई आम्ही पूर्ण ताकदीने लढू. आता देव, देश आणि धर्मासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी मैदानात उतरावे.

मराठी माणसाचे नाव घेऊन आपली घरे भरली, त्यांच्यासाठी गेल्या २५ वर्षांत केलेले एखादे काम तरी ठाकरे यांनी सांगावे, असे आव्हान देत फडणवीस म्हणाले, ठाकरे सरकार हे स्थगिती सरकार होते व त्यांनी मुंबईतील विकासकामे बंद पाडली. पत्रा चाळ पुनर्विकासात भ्रष्टाचार झाला. हा पुनर्विकास आम्ही मार्गी लावला, बंद पडलेल्या प्रकल्पांची कामे महायुती सरकारने मार्गी लावली. झोपडपट्टी पुनर्वसन, जुन्या इमारतींचा पुनर्विकास आदी प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक निर्णय व ११ योजना सुरू केल्या. सागरी किनारपट्टी मार्गाचे काम वेगाने होत असून अनेक वर्षे काँग्रेस सरकारने नुकतीच चर्चा केलेल्या अटल सेतूचे काम पूर्णत्वास नेले. मुंबईत पायाभूत सुविधांची अनेक कामे सुरू आहेत. काँग्रेस सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात ११ किमी मेट्रोचे काम झाले, तर आमच्या सरकारने पाच वर्षांत ३५४ किमी मेट्रोची कामे सुरू करून सुमारे १०० किमीची कामे वेगाने पूर्ण केली, असे देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.



# आंबेडकरी राजकारणाचे संदर्भ आणि वस्तुस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विशेष म्हणजे भारतीय निवडणूक म्हणजे राजकीय पक्षाची परीक्षा. परीक्षेत चिटींग होते तर निवडणूकीत चिटींग, सेटींग अजून बरचं काही सत्तेसाठी साम, दाम, दंड भेद ही अनीतीही अनेक पक्ष अवलंबितात राजकीय नैतिकता ही लोकशाही निवडणूकीची खुबी आहे. पण हे कुणासाठी? ज्यांची राजकीय गणितं जुळली आहेत ज्या पक्षाचे व्यवस्थापन चांगले आहे, योग्य नियोजन आहे लोकशाहीत प्रतिपक्षाचं आव्हान स्वीकारायला जे तयार आहेत त्यासाठी परंतु योग्य व्यवस्थापनाचा व आर्थिक नियोजनाच्या अभावी अनेक छोट्या, प्रादेशिक पक्षांची भंबेरी उडते. अनेकदा बंडाळी माजते. याविषयी आपणास अधिक्याचे काही घेणे देणे नाही.

प्रश्न आहे तो आमच्या राजकीय अस्तित्वाचा ह्या निवडणूकीत आमची काय भूमिका आहे आम्ही भावनिक नव्हे तर दूरदृष्टीने विचार केला पाहिजे. मतं कुणाला द्यावीत हा तर तुमचा अधिकार आहे. तुमचं एक मत कुणाला देशाचा प्रधानमंत्री, मुख्यमंत्री करू शकत किंवा एका वरचढ मताने त्या सन्मननीय बहुमानावरून खाली खेचू शकते ऐवढी प्रचंड शक्ती मताधिकारात आहे. राष्ट्रीय पक्ष मान्यताप्राप्त पक्ष (बसपा) महाराष्ट्रात आपली प्रभावित शक्ती गमवून बसला आहे. पक्षनेतृत्वाला काही घेणेदेणे राहिले नाही. दुसरी महत्वपूण बाब म्हणजे (भारिप) विसर्जित करून अलीकडेच उदयास आणलेला (वंबआ) व पक्षनेतृत्वाच्या चुकीच्या निर्णय, जनतेच्या मताचा अनादर केल्यामुळे मागील लोकसभा निवडणूक संकीर्ण, आत्मघातकी राजकारण करून द्रव्यलाभ होईल, काही मते वळवून ध्रुवीकरण करून तुम्ही स्वतःच अस्तित्व का पुसून टाकत आहात. साधी आणिसहज लक्षात येणारी बाब म्हणजे महाराष्ट्रातील बडा कॉंग्रेस पक्ष वगळता शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ह्याच्यात अलीकडेच उभी फूट पडली असून मोठी धांदली उडालेली आहे. त्यांच्या अंतर्गत मतभेदाची ही कारणे असतील असो त्यामधले राष्ट्रवादी (अजित पवार), शिवसेना (शिंदे) हे बीजेपी सोबत युती करून लढताहेत तर दुसरीकडे, कॉंग्रेस शिवसेना (ठाकरे) राष्ट्रवादी (शरद पवार) प्रबळ शक्तीनिशी एकमेकांना शह देत आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात आंबेडकरी, बहुजन राजकारण्यांना स्वतःहून निर्माण झालेली संधी हा अवकाश ही दुरावलेली पातळी ऐक्यतेने का सांधता येत नाही आहे. हा टर्निंग पाईंट तुम्ही हातातून घालवत आहात कारण प्रस्थापित कॉंग्रेस पक्ष सोडता शिवसेना (दोन्ही गट) व राष्ट्रीवादी (दोन्ही गट) आणि कुरघोड्य करून पक्ष फोड्या करणारा बीजेची हया सर्वांनाच महाराष्ट्रातल्या सूज्ञ जनतेनी चांगला धडा शिकविला असता. पण ती संधी आंबेडकरी नेत्यांनो, दलित बहुजन नेत्यांनो तुम्ही दूर्विलाशी आहात, आत्मघातकी आहात, कपाळकरंटे आहात. निदान ह्या निवडणूकीच्या पूर्व संध्येला तरी तुम्ही नव्या तिसऱ्या फ्रन्टची आघाडी उभी केली असती त्याचा फायदा नक्कीच झाला असता. पहा, किती विरोधाभास आहे प्रबळ पक्ष युतीने लढताहेत आणि बहुजनांचे, दलितांचे, वंचितांचे, दुबळ्यांचे, साबळयांचे नेतृत्व करू पाहणारे मुद्दाम समविचारी पक्षाशी युती न करता सर्व जागांवर स्वबळावर लढताहेत. मोठे सत्ताधीन असलेले पक्ष विसंगत विचाधारेशी युती करताहेत तुम्ही समविचारी विभक्त लढताहेत हा तुम्ही समाजाला दिलेला धोका आहे. गद्दारी आहे तुम्ही



करताहेत ते आंबेडकरद्रोही राजकारण आहे. तुमचा आर्विभाव, तुमची प्रस्थापितांशी असलेली सेटींग, तुमची अवाजवी महत्त्वकांक्षा तुमच्या एकूण राजकारणाला संपुष्टात आणेल कारण आंबेडकरी राजकारण हे न्याय, नीतिचं राजकारण आहे. आमचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अज्ञानी, निरक्षर समाजाला सोबत घेवून कॉंग्रेस सारख्या महाशक्तीला हादरा दिला. स्वबळावर तीन तीन राष्ट्रीय पक्ष निर्माण केले. स्वतंत्र राजकीय शक्ती निर्माण करून ब्रिटीश व्हाईसरॉयच्या सिनेटचे सदस्य झाले. पुढे नेहरूंच्या मंत्रीमंडळात महत्वपूर्ण खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून कार्यभार सांभाळला. बाबासाहेबांनी अडाणी समाज तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपला ही होती शक्ती आणि तुमचं भाषण, 'कुठे शेंडा आणि कुठे बुड' सारी अरेरावी, चुकून ऐक्याची भाषा नाही. निदान समाजाच्या इच्छेपोटी तरी अरेरे फार वाईट अशा विपरीत अवस्थेतही, आंबेडकरी समाजाने निराश होऊ नये. उजवी संघवादी, प्रतिक्रांतीवादी शक्तीला नामोहरम करणा-या, शह देणाऱ्या योग्य उमेदवाराला आपली बहुमोल मतं द्यावीत. आपला पक्ष म्हणून कुठे शिल्लक राहिलाय? आपली मतं वळवून उजवीशक्तीत बळावते आहे ते गणित सोडवा तुम्हाला उत्तर मिळेल. त्याचा पडताळा ह्या आमच्या अमूल्य मताचा खेळखंडोबा आता थांबवावा लागेल. 'मतदान' नावाच तीक्ष्ण शस्त्र आपल्या हातात बाबासाहेबांनी दिलं आहे त्याचा अंतर्मुख होऊन वापर करा. भारतीय लोकशाहीच्या वृद्धिसाठी संविधानाच्या अंमलबजावणीसाठी, एकात्म भारतीय राष्ट्राच्या उभारणीसाठी, जनतेच्या समृद्धिसाठी, खऱ्या विकासासाठी व मूल्यात्म नैतिक राजसत्तेसाठी योग्य दूरदृष्टीच्या उमेदवारास मतं द्या. मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे ते अमूल्य आहे ते कदापी विकू नका. ह्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापूरच्या दौऱ्यावर असताना निवडणूकीच्या दरम्यान त्यावेळी ते जनतेला आवाहन करतांना म्हणतात की, बंधुनो, तुमच्या मताची किंमत मीठ मिरचीसारखी समजू नका. तुमच्या प्राणाइतकीच किंबहुना जास्तच तुमच्या मताची किंमत आहे, हे विसरू नका. भलत्याच उमेदवाराला मत द्याल तर खाटकाच्या हातात बकऱ्याने सुरी दिल्यासारखे होईल. श्री जिवाप्पा ऐदाळे हे माझ्या पक्षाचे उमेदवार आहेत. त्यांना ध्येय आहे, त्यांना तत्त्व आहे, त्यांची आणि तुमच्या भावी हितानहिताची सर्व जबाबदारी माझ्या शिरावर आहे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण, पृ. क्र. ९२) असा होता आमचा सर्वोच्च नेता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! स्वतः बाबासाहेबांनी केलेलं हे आवाहन आहे आणि ते आजच व उद्याही आम्हा भारतीय जनतेसाठी प्रमाण सिद्ध आहे. त्यांच्या पुढे मताची किंमत मी पामर काय सांगू? मी उत्तरार्धात आंबेडकरी राजकारणाच्या संदर्भात ही राजकीय व्यवस्था, प्रचंड नियोजनाचा अभाव असमंजस्यभाव, राजकीय शून्यता अनुभवून काळजात पीळ पडतो. आंबेडकरी राजकारणाचा सूर्यास्त होता की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. वेळ प्रसंगी कॉंग्रेससारख्या धर्मनिरपेक्ष पक्षाला साथ द्या परंतु कुठल्या परिस्थितीत हिंदु राष्ट्रवादाच्या, सनातनी मूलतत्त्ववादी शक्तींना रोखा. हा महाराष्ट्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर म. जोतीराव फुले व राजर्षी, शाहू महाराजांची कर्मभूमी आहे त्यांच्या आचार विचारांच्या माध्यमातून राजकीय प्रबोधन कार्यप्रवण व्हावं ही आशा करून तूर्तास थांबतो.

संदर्भ :

१. भारतीय रिपब्लिकन पक्ष आर. के. क्षीरसागर,

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, (डॉ. बा. आं. चरित्र व साधने प्रकाशन समिती म. शासन)

**डॉ. कोंडबा भगवान हाटकर**
एम.ए. (मराठी) एम.फिल., नेट, सेट, पीएच.डी पोस्ट डॉक्टरेट फेलो.
मो. नं. ९५५२१३३९५१
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद.)

## संपादकीय....

### हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ

मणिपूरमध्ये अनेक दिवसांपासून हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. मणिपूरमधील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी भारतीय लष्कराच्या जवानांना देखील काही दिवस तैनात करण्यात आलं होतं. त्यानंतर काही ठिकाणी परिस्थिती पूर्व पदावर येत असतानाच आता पुन्हा एकदा काही ठिकाणी गोळीबाराच्या घटना घडत असल्याचं समोर येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये सातत्याने हिंसाचाराच्या घटना समोर येत आहेत. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यू देखील झाल्याच्या घटना गेल्या वर्षभरात समोर आलेल्या आहेत. आता मणिपूरमध्ये सीआरपीएफच्या जवानांनी दहशतवाद्यांच्या विरोधात मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. जिरीबाम भागात सीआरपीएफच्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाले. सीआरपीएफच्या जवानांनी केलेल्या कारवाई दरम्यान दोन जवानही गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, काल दहशतवाद्यांनी काही दुकानांना आग लावली होती. तसेच त्यांनी काही घरांवर आणि सीआरपीएफ कॅम्पवरही हल्ले केले होते. यानंतर सीआरपीएफच्या जवानांकडून दहशतवाद्यांच्याविरोधात कारवाईची मोहिम राबवण्यात आली. यावेळी सीआरपीएफ जवानांनी केलेल्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाले आहेत. दरम्यान, सीआरपीएफच्या कारवाईत मारल्या गेलेल्या संशयित अतिरेक्यांचे मृतदेह बोरोबेकरा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे. याबरोबरच काही नागरिक बेपत्ता असून अतिरेक्यांनी त्यांचं अपहरण केलं आहे की जवानांच्या कारवाईमुळे ते नगरिक लपून बसले आहेत याची माहिती घेतली जात असल्याचं अधिकाऱ्यांनी माहिती देताना म्हटलं आहे. सशस्त्र दहशतवाद्यांनी बोरोबेकरा उपविभागातील अनेक दुकाने पेटवून दिल्याने जिरीबाम परिसरात तणाव निर्माण झाला होता. जूनपासून या भागात सातत्याने हिंसाचाराच्या घटना समोर येत आहेत. दहशतवाद्यांनी बोरोबेकरा पोलिस ठाण्यावर गोळीबार केला. यानंतर ते जाकुराडोर करोंग भागात गेले. त्या ठिकाणी त्यांनी आग लावली. यानंतर दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली, त्यामुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला.

# लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने समतानगर, बोरिवली मराठी शाळेत विद्यार्थी दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
भिवंडी/प्रतिनिधी

सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूल या सरकारी शाळेत ७ नोव्हेंबर १९०० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेचा पहिला दिवस नोंद झाला आहे. २०१७ साली राज्यभर हा दिवस विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जावा असा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यास अनुसरून ७ नोव्हेंबर २०२४ रोजी ''




लोकधारा प्रतिष्ठान'' ट्रस्टच्या वतीने भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परीषद समतानगर ,बोरीवली मराठी शाळेत 'विद्यार्थी दिन' साजरा करण्यात आला. शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना महामानवांचा इतिहास, त्यांची गौरवगाथा माहिती व्हावी . विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे म्हणूण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माहिती विद्यार्थांना लोकधारा प्रतिष्ठान'' ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी सांगून विद्यार्थ्यांना कविता सादर करून दाखवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणा विषयी विविध पोस्टर समतानगर ,बोरीवली जि. प. मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी दाखवत शिक्षणाचा व साक्षरतेचा सामाजिक संदेश दिला.तर विद्यार्थ्यांनी आपले भाषणे सादर केली. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान'' ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव, मुख्याध्यापिका भावना घरत,अंगणवाडी सेविका विद्या जाधव, आशा वर्कर अश्विनी दोंदे,मदतनीस सिमा जाधव, सुरज गायसमुद्रे ,विद्यार्थी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ लातुरात अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या सभेला उस्फुर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
लातूर/प्रतिनिधी : अमर जाधव



अॅड बाळासाहेब आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडीच्या प्रचारार्थ झालेली जोशबा महासंकल्प सभा अत्यंत ऐतिहासिक ठरली. सभेतील उत्साही वातावरणात दलित, आदिवासी, ओबीसी आणि इतर समाज घटकांनी एकजुटीने आपला निर्धार व्यक्त केला. सर्व उपस्थितांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून त्यांच्या ध्येयांसाठी लढा देण्याची शपथ घेतली. या महासंकल्प सभेने बहुजन समाजाच्या हक्कांसाठी सशक्त आवाज उठविण्याचा दृढ निर्धार केला आहे.

सभेतील प्रमुख नेत्यांनी वंचित बहुजन आघाडीच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला आणि सर्वसमावेशक राजकारणावर जोर दिला. समाजातील प्रत्येक घटकासाठी समान हक्क आणि संधी मिळवून देण्याच्या कार्याची जबाबदारी घेतली गेली. आगामी निवडणुकांमध्ये सर्व समाज घटकांना एकत्र करून मोठ्या विजयासाठी संघर्ष करण्याची तयारी व्यक्त करण्यात आली.


सभा संपत असताना, उपस्थितांनी संकल्प केला की बहुजन समाजाच्या राजकीय भविष्याच्या दिशेने हा लढा अखेरच्या श्वासापर्यंत चालवला जाईल.

# हटकर व मंगेवाडी येथील कार्यकर्त्यांचा दीपक आबांच्या उपस्थितीत ठाकरे शिवसेनेत प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुका सांगोला महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगोला तालुक्यातील हटकर व मंगेवाडी येथील कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मशाल हाती घेतली व दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वात विश्वास ठेवून त्यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आपल्याबरोबर आपल्या पक्षावर जो विश्वास या कार्यकर्त्यांनी दाखवला त्याबद्दल विशेष ऋणी व्यक्त करीत तालुक्यातील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत विकास कामांना निधी कमी पडू दिला जाणार नाही असा विश्वास प्रवेश करते ग्रामस्थांना दीपक साळुंखे पाटील यांनी दिला.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून दीपक आबा साळुंखे पाटील यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला त्यानंतर तालुक्यातील हजारो कार्यकर्ते दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करताना दिसत आहेत. दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी इच्छुक असल्याने दररोज शेकडो कार्यकर्ते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये प्रवेश करीत आहेत. तालुका सांगोला येथील बाळू मारुती भुसनर, नारायण यशवंत भुसनर, बाळू भुसनर किशोर



हरिभाऊ डोरले धनाजी महादेव जाधव या कार्यकर्त्यांनी दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करून मशाल हाती घेतली यावेळी संभाजी पाटील शिवाजी भोसले सुनील खांडेकर सागर भुसनर अजून घुसणार परमेश्वर भटकर नितीन भुसनर तानाजी भुसनर गोविंद घोषणा नितीन होर्गर सुनील खांडेकर नारायण माळी राम बाबर राजू गुजले यांच्यासह शिवसेनेत पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांनी प्रचारांमध्ये घेतली आघाडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील देगाव या गावाला आज रविवार दिनांक दहा तारखेला महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांनी भेट दिली

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार पक्षाची कर्नाटक राज्याचे प्रदेशाध्यक्ष एस सी इनामदार, आणि महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देगाव गावचे ग्रामदैवत मायाक्का चे दर्शन घेऊन सभेला सुरुवात करण्यात आली मायाक्का मंदिराची संवाद सभा पार पडली व सभेमध्ये अनिल सावंत यांनी उपस्थित नागरिकांची संवाद साधला आणि सावंत म्हणाले, आतापर्यंत पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची पाणी प्रश्नावर झाली पाणी प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. मात्र किती दिवस आपण या प्रश्नावर निवडणूक लढवणार आहात. येणाऱ्या काळात निश्चितपणे पाणी प्रश्न कायमचा सोडवला जाईल याशिवाय पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात मोठ-मोठे उद्योगधंदे शिक्षण संस्था आयटी हा करण्याचा माझा स्वप्न आहे.

सभेनंतर देगाव गावातील विविध पदाधिकारी आजी-माजी सरपंच ग्रामपंचायत आजी-माजी सदस्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षांमध्ये पक्ष प्रवेश केला.

पक्षप्रवेश विलास बनसोडे, बालाजी ढेकळे, संतोष डोईफोडे, (ग्रामपंचायत सदस्य) हनुमंत बनसोडे (सरपंच) कांतीलाल दुधाळ, मल्हारी ढोबळे, सचिन चौगुले, कासलिंग बनसोडे, राजाराम डोईफोडे गंगाराम मोरे, संजय बनसोडे, दत्ता डोईफोडे, केराप्पा ढेकळे, भागवत ढेकळे, दत्ता गोरे या सर्व पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये कर्नाटक राज्याचे प्रदेशाध्यक्ष इनामदार यांच्या उपस्थित राष्ट्रवादी कॉंग्रेस शर्यचंद्र पवार पक्षात प्रवेश करून अनिल सावंत यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

# निफाड नगरपंचायतीच्या वतीने वाटोबा द्वारे मतदान जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे कामकाजास सुरुवात झाली असून दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पार पडणार आहे.



सदर निवडणुकीत निफाड शहरातील सर्व मतदारांनी १००% मतदान करावे यासाठी संपूर्ण निफाड शहरात निफाड नगरपंचायतीतर्फे विविध कार्यक्रमाद्वारे मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, अमोल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड शहरातील सर्व गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, फळ विक्रेते, दुकानदार, विविध आस्थापना , निफाड रा. प. बस स्थानक येथे जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातून पुरविण्यात आलेल्या वोटोबा या शुभकरांद्वारे मतदान जनजागृती करणेत येत आहे.

वाटोबा या शुभंकरामुळे निफाड नगर पंचायतीच्या मतदान जनजागृती मोहिमेस निफाड शहरातील नागरिकांचा चांगलाच प्रतिसाद मिळत असून शहरातील ज्या परिसरात मागील विधानसभा तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण कमी झाले आहे अशा परिसरात निफाड नगरपंचायतीकडून विशेष मतदान जनजागृती मोहीम हाती घेण्यात आलेली आहे याचा एक भाग म्हणून नगरपंचायतिच्या विशेष पथकाद्वारे घरोघरी भेटी देण्यात येत आहेत. सदर भेटी दरम्यान शहरातील नागरिकांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती, मतदान केंद्रावरील सुख सुविधा इ. ची माहिती देण्यात येत असून विविध माहितीपत्रके तसेच बॅनर, पोस्टर द्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. तसेच मतदान विषयक रांगोळी व पथनाट्याद्वारे देखील शहरात मतदान जनजागृती करणेत आली.शहरातील सर्व मतदारांनी दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत आपल्या मतदानाचा बहुमूल्य अधिकार बजावून मतदान अवश्य करावे, याविषयी निफाड नगरपंचायत तर्फे सर्व मतदारांना आवाहन करण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सिंहगड कॉलेज जवळ अपघात; एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : सिंहगड कॉलेज येथील रस्त्यावर अपघात प्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ९ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी पोलिस हवालदार काझी नेमणूक मोटार परिवहन विभाग यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद नवनाथ देशमुख (वय-१९,रा.बंकलगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील सरकारी वाहन क्रमांक एमएच.१३.पी.०४४९ ही बस घेऊन सिंहगड कॉलेज केगाव सोलापूर ते आयटीबीपीचे २५ अंमलदार यांना घेऊन जात असताना सिंहगड कॉलेजच्या वडील सर्विस रोडवर थांबले असता त्यावेळी दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीव्ही.०३१० यावरील दुचाकीस्वाराने निष्काळजीपणाने व भरधाव वेगात वाहन चालवून सरकारी वाहनाला धडक देऊन वरील संशयित आरोपी हा जखमी झाला आहे. तसेच सरकारी वाहनाचे नुकसान करून फिर्यादी यांना जखमी केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

### कंटेनरची वाहनास धडक; अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : कंटेनरची एका वाहनास धडक दिल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १० नोव्हेंबर रोजी दुपारी पावणेतीन वाजण्याच्या दरम्यान तुळजापूर सोलापूर कडे येणाऱ्या चव्हाण दुकानासमोर घडली.याप्रकरणी इंद्रजीत अनंत जगताप (वय-३७,विजयश्री निवास प्रसाद कॉलनी,जिल्हा धाराशिव) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जगताप हे करीत आहेत.

### प्रवासात महिलेची एक लाखांची रक्कम लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : रिक्षात प्रवास करत असताना एका महिलेजवळ असलेल्या एक लाख रुपयांची रक्कम अज्ञात महिलेने चोरून नेल्याची घटना दि.६ नोव्हेंबर रोजी पाच वाजण्याच्या सुमारास बाळवेस ते कौतम चौक दरम्यान घडली.याप्रकरणी शहाजान मोहमद हानिफ शेख (वय-५९,रा.कासेगाव) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व त्यांची आई असे बाळीवेस येथील एसबीआय बँकेतून एक लाख रुपयांची रक्कम काढून ती रक्कम फिर्यादी यांच्या आईकडील हॅन्डबॅग मध्ये ठेवली.त्यानंतर फिर्यादी व त्यांची आई या बाळीवेस ते कौतम चौक असे रिक्षा मधून प्रवास करत असताना अज्ञात महिलेने फिर्यादी यांच्या आईची नजर चुकून त्यांच्या आईकडे हॅन्डबॅग मधील ठेवलेली रक्कम चोरून नेली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आर्यनहरू हे करीत आहेत.

# महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दीपक आबा साळुंखे यांच्या सभेला ५० हजारांचा जनसमुदाय

## सांगोल्यात दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या प्रचारार्थ शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २०१९ रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मी शिवसेनेला पक्षाकडून दीपक आबा साळुंखे पाटील यांना उमेदवारी देणार होतो परंतु काही कारणास्तव मी त्यांना उमेदवारी देऊ शकलो नाही २०१९ ला शिवसेनेचे आमदार निवडून आणणार असा त्यांनी मला शब्द दिला होता सर्वसामान्य जनतेसाठी लढणारे दीपक आबा साळुंखे पाटील यांच्यासारखी सैनिक मला आणि संपूर्ण महाराष्ट्राला आवडतात सांगोला विधानसभा मतदारसंघातील जनतेने फक्त दीपक आबा साळुंखे पाटील यांना आमदार करावे सांगोला तालुक्यातील जनतेच्या मनात असणाऱ्या हे



काही प्रश्न शिल्लक ठेवणार नाही असे अभिवादन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी तमाम सांगोळकरांना दिले.

सांगोला येथील या अति विराट आणि रेकॉर्ड ब्रेक सभेला उद्देशून बोलताना उद्धव साहेब ठाकरे म्हणाले की महाराष्ट्राला इतिहास आहे हा महाराष्ट्र कधीही मराठाला क्षमा करत नाही इथल्या गद्दारांनी गुवाटिका डोंगर पाहिला रायगड टोक नाही पाहिलं सांगोला तालुक्यातील सुजान जनता याच गद्दारांना २३ तारखेला रायगडची टकमक टोक दाखवल्याशिवाय राहणार नाही असे त्यांनी यावेळी उद्धव साहेब ठाकरे म्हणाले गद्दारांच्या छाताडावर भगवा रवायला मी सांगोल्यात आलो आहे येत्या २३ तारखेलासांगोल्याची जनता गद्दारांना कडी लोट करील आणि २४ तासात जनतेची प्रामाणिकपणे सेवा करणारा दीपक आबा साळुंखे पाटील यांच्यासारखा सैनिक महाराष्ट्राच्या विधानसभेत पाठवेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला व शिवापूर येथील तोंडाक्यावर एकाची पैशाची गाडी सापडली होती त्यात २५ कोटी होती पण पाच कोटी रुपये दाखवले व सांगोला तालुक्यातील जनता ही स्वाभिमानी आहे ती खराबी विकली जाणार नाही स्वाभिमानी सांगोला कर २० नोव्हेंबरला रोजी मशालीचे बटन दाबून नक्कीच दीपक आबा यांना प्रचंड मताने विजयी करतील आणि शहाजी बापू पाटील यांना कायमस्वरूपी घरी बसवतील असा विश्वासही शेवटी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी व्यक्त केला.

**२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दीप दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला येथे आयोजित केलेल्या अति विरार सभेला संबोधित करताना उद्धव साहेब ठाकरे बोलत होती सांगोला तालुक्याच्या राजकीय इतिहासातील ही ऐतिहासिक आणि रेकॉर्ड ब्रेक सभा ठरली या अति विराट आणि अति भव्य सभेसाठी दीपक आभार साळुंखे पाटील यांच्या एक हाकिवर तब्बल ५० हजार सांगोलकरांनी या सभेला उपस्थित दर्शविल्याने संबंध राज्यभर या सभेची चर्चा रंगली सांगोला विधानसभा मतदारसंघातील धनगर समाज बांधवांनी काठी गोमूडा आणि ढोल घेऊन उद्धव साहेब ठाकरे यांचा सत्कार केला.**

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तहसील प्रशासन सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राज्यासह तालुक्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकी करिता अक्कलकोट तहसील प्रशासन जोरदार तयारी सुरु केली असून, काल उण, इण, ततझढ पेरिंग करण्याचे काम संपवले असून, आज पासून, मतदानासाठी ईव्हीएम मशीन तपासणी करून सील बंद करण्याचे सुरु होणार आहे.



अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने एम -३बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व व्हीव्हीपॅड, मशीन वापर यासंदर्भात केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचा प्रशिक्षणाचा पहिला व दुसरा टप्पा पूर्ण झाला असून, यात एकूण १८१० अधिकाऱ्यांनी भाग घेतले होते.

निवडणुकीतील नवीन कायदे, तरतुदी व अध्यावत सूचना, पोस्टल मतदान, व निवडणूक कार्य प्रमाणपत्र, मशीन सिलिंग, व व्हीव्हीपॅड ची डूज अँड डोन्ट्स, संकलन केंद्र, मतदान पूर्व, मतदान दरम्यान, मतदान समाप्तीवेळी करावयाची कामे आदीबाबत माहिती देण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे व सहायक निवडणूक अधिकारी तहसीलदार विनायक मगर, नायब तहसीलदार विकास पवार, विजयकुमार गायकवाड, संजय भंडारे, उपस्थित होते.

तसेच निवडणूक शाखेत मतदान याद्या बाणफुली शिक्का, तसेच साहित्याचे काम जवळपास पूर्ण झाले असून, मतदार व मतदानाकरिता लागणाऱ्या सर्व बाबी ह्या निवडणूक शाखेतून जवळपास पूर्ण झाले असून, याकरिता निवडणुक नायब तहसीलदार विजयकुमार गायकवाड, महसूल सहायक श्रीमंत सारणे, अशी माहिती यांनी दिली.

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात ३ लाख ८३ हजार ४७९ मतदार असून त्यात पुरुष मतदार १ लाख ९६ हजार ५७७ तर १ लाख ८६ हजार ८५९ स्त्री मतदार असून, सैनिक मतदार ४३४ असून, पुरुष ४२५, स्त्री ९ असे आहे. अक्कलकोट शहर व ग्रामीण मतदान केंद्र ३०५ व दक्षिण सोलापूर मधील अक्कलकोट विधासनभा परीक्षेत्रात येणारे मतदार संघ ९१ असे एकूण ३९६ एवढे मतदान केंद्र करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांनी दिली.

निवडणूक निर्णय अधिकारी विधानसभा मतदार संघ यांचे कार्यालयात नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून मतदान टक्केवारी वाढविण्या साठी मतदान वाढावे यासाठी मतदार जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मतदान केंद्रावर मतदारांकरिता आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वयोवृद्ध व दिव्यांग मतदारांना मतदानाचा हक्क बजावणे सुलभ व्हावे याकरिता घरोघरी मतदानची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आपल्या घरातील लग्न समारंभ वा सणांप्रमाणे हा लोकशाहीचा उत्सव साजरा करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे व सहायक निवडणूक अधिकारी तहसीलदार विनायक मगर यांनी केले.

# प्रविण भैया माने यांच्या किटली ची गावोगावी जोरदार चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

इंदापूर : प्रवीण माने यांनी इंदापूर विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला आणि अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्धार मेळाव्यातच बाबीर देवाचा गुलाल उचलुन काही झाले तरी उमेदवारी अर्ज मागे घेणारच नाही असे जाहीर केले



त्यामुळे आता ते इंदापूर तालुक्यातील गावोगावी वाड्यावस्त्यावर प्रचारासाठी दौरे करत असून त्या दौऱ्यात अपक्ष उमेदवार प्रवीण यांना जोरदार प्रतिसाद मिळत आहे.

**मातब्बर नेते मंडळी यांची धाकधुक वाढली**

काही गावात घोड्यावरून मिरवणूक जेसीबी तुन फुलांचा वर्षाव बैलगाडीतुन ग्रामस्थ प्रविण भैया माने यांना गावभर फिरवत जल्लोषात स्वागत करत आहेत.

मायमाउल्या ओवाळून स्वागत करत आहेत .युवकांची मोठी फळी प्रवीण माने यांच्या पाठीशी उभी राहत असून मातब्बर सत्ताधारी विरोधकांनाही प्रवीण माने यांच्या वाढत्या जनाधारामुळे घाम फुटल्याची सध्या चर्चा आहे.

एकंदरीत प्रवीण माने इंदापूर विधानसभेत किंग मेकर ठरण्याची शक्यता आहे.

# समाज बांधवांनी अंधश्रद्धेतून बाहेर येवून बहुदेव उपासना सोडून त्या इष्टलिंगाची पूजा करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : लिंगायत लोक हे एकदेव उपासक आहेत. समाज बांधवांनी अंधश्रद्धेतून बाहेर येवून.बहुदेव उपासना सोडून त्या इष्टलिंगाची पूजा करावी बसव मंटप मुगळी चे महानंदाताईंनी सल्ला दिला.

जागतिक लिंगायत महासभा सोलापूर आणि किरीटेश्वर संस्थान मठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेले तिसऱ्या शिवानुभव गोष्टीत त्यांनी बोलले. बाराव्या शतकात बसवकल्याण जगात न अभूतपूर्व क्रांती झाली, ती क्रांती



धार्मिक क्रांती, लोकांचे जीवन उन्नती साठी, धर्म आणि देवाच्या नावाने छळ विरुद्ध समानतेसाठी झालेली क्रांती. या क्रांतीत सहभागी होऊन सोलापूरच्या सिद्धराम कर्मयोगी ते शिवयोगी झाले. आजही ते सोलापूरच्या भाविकांच्या मनात कायम आहे. लिंगायतांसाठी बसवण्णा, शिवयोगी सिद्धराम पूजनीय आहे. बसवदि शरणानी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले.

जागतिक लिंगायात महासभा सोलापूर जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव बोलले, प्रति महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मठाच्या सहकार्याने हा शिव अनुभव सोलापुरात ही गोष्टी होत आहे. जिल्ह्यातील लिंगायत बहुसंख्य आहेत. या गोष्टीत सहभागी होण्यासाठी विनंती केली.

किरीटेश्वर संस्थान मठ मठाधिपती स्वामीनाथ महास्वामी यांचे सानिध्यात मुख्याध्यापक लक्ष्मण चलगेरी अध्यक्षस्थानी होते .मीनाक्षी थळंगे आणि महादेवी तेली हे प्रमुख पाहुणे होत्या. जालिमा महिला अध्यक्षा राजश्री थळंगे, मीनाक्षी बागलकोटे, मल्लिनाथ थळंगे, शिवराय तेली, राजेंद्र हौदे, चन्नबसव गुड्डेवाडी, लक्ष्मी गुड्डेवाडी, जालिमा चे सदस्य, शंकरलिंग महिला मंडळ चे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. शशिकलाताई रामपुरे यांनी सूत्रसंचालन केले.

**सोलापूर येथे स्वीप मल्टीमीडिया व्हॅनचा शुभारंभ**

**मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय संचार ब्यूरोचा उपक्रम**

# लोकशाही बळकटीकरणसाठी लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावे : अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर. : भारतीय लोकशाहीला बळकट करण्यासाठी लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे. विशेषतः नव मतदारांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी आज येथे केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवणे आणि नव मतदारांना मतदान करण्याकरिता प्रेरित करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित स्वीप मल्टीमीडिया व्हॅनच्या शुभारंभ प्रसंगी श्रीमती ठाकूर बोलत होत्या.

यावेळी केंद्रीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, स्वीपचे नोडल अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, शिक्षणाधिकारी कादर शेख, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ राजेंद्र वडजे,




सरकारी कामगार अधिकारी विलास गायकवाड, समाज कल्याण अधिकारी सचिन कवले आणि सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती ठाकूर म्हणाल्या, मागील विधानसभा निवडणूक व लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये जिल्ह्यातील मतदानाचे प्रमाण अल्प असलेल्या भागांमध्ये मल्टीमीडिया व्हॅनच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. सदर व्हॅन सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघातील १०० हून अधिक ठिकाणी प्रवास करेल, ज्यात मतदानाचे प्रमाण अल्प असलेल्या भागांचा समावेश आहे. ही व्हॅन मतदान प्रक्रिया, मतदान केंद्राची ठिकाणे, आदर्श आचारसंहिता आणि कोणत्याही प्रकारच्या उल्लंघनाबाबत तक्रारी दाखल करण्यासंबंधाची माहिती आणि ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्यक्तींनी नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केल्याचे व्हिडिओ संदेश एलईडी स्क्रीनवर पाहता येणार आहे.मतदारांचा सहभाग वाढविणे आणि नागरिकांना निवडणूक प्रक्रियेबद्दल साक्षर करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ०७ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत जिल्ह्यातील सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन**

यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ दिली. शाहीर रमेश खाडे यांच्या पथकाने मतदान करण्याविषयी गाण्याच्या माध्यमातून सादरीकरण केले. यावर्षी प्रथमच मतदान करत असलेल्या भाग्यश्री अंकलगी आणि नागेश सोनसाखळे यांनी येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ०७ ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत सर्वांनी मतदान करावे असे आवाहन केले. या नव मतदारांचा अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी स्वीपचे सहायक नोडल अधिकारी रुपाली भावसार, गोदावरी राठोड, स्वाती स्वामी, अमोल भोसले, शाहबाज काजी, अनिल थोरबोले, साईराज राउळ, योगीराज कोंडाबत्तीन आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संगमेश्वर कॉलेज आणि वालचंद महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपक्ष उमेदवार प्रविण भैया माने यांचा विरोधकांनी घेतला धसका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील आजी माजी आमदारांनी प्रविण भैया माने यांचा धसका घेतला असुन प्रविण भैया माने यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतल्याने विरोधक पुरते धास्तावले असल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे त्यातच आता इंदापूर तालुक्यातील शहा गावात अपक्ष उमेदवार प्रवीण भैया माने यांच्या प्रचाराचा बॅनर फाडल्याने राजकीय वातावरण तापले असले तरी अपक्ष उमेदवार प्रविण भैया माने यांनी विषयावर प्रतिक्रिया देणे टाळले असुन माझे बॅनरच विरोधक फाडू शकतील.




मी जनतेच्या हृदयात आहे जनतेच्या हृदयातून मला फाडू शकणार नाहीत असेही प्रवीण भैया माने चर्चेदरम्यान म्हणले.

**इंदापूर तालुक्यातील राजकीय वातावरण तापले**

हत्ती चला बजार कुत्ते भोगते हजार असेही प्रवीण भैया माने म्हणाले.

## थोडक्यात...

### चाकूने वार ; एकावर गुन्हा

सोलापूर : विनाकारण रागाने बघून पायाजवळ थुकल्याप्रकरणी एकाने लाथा बुक्क्यांनी मारहाण करून चाकूने खांद्यावर वार करत तुला बघून घेतो अशी धमकी दिल्याची घटना ७ नोव्हेंबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मोदीखाना येथे घडली.याप्रकरणी मोहसीन अलीम शेख (वय-३३,रा.नवीन विडी घरकुल) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून इम्रान हवालदार (वय-इकरार अली मशिद,बुधवार बाजार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी मोदीखाना येथून पायी रेल्वे बोगद्यातून रामवाडीकडे नातेवाईकांना भेटण्यासाठी जात होते.त्यावेळी वरील संशयित आरोपी याने विनाकारण रागाने बघून पायाजवळ थुंकला व फिर्यादी यांनी देखकर थुंकना नाही आता क्या ? असे म्हणाले असता वरील संशयित आरोपी याने रोड तेरे बाप का है क्या ? असे म्हणून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.त्यानंतर खिशातील चाकू काढून फिर्यादी यांच्या खांद्यावर मारून जखमी करत तुला बघून घेतो अशी धमकी दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

### तरुणास लोखंडी रॉडने मारहाण ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) तरुणास लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास मंत्री चंडक येथे घडली.याप्रकरणी प्रदीप कामण्णा व्हनसुरे (वय-१८,रा.हराळे वस्ती,कुमठा कॉर्नर) याने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून धारासिंग रजपूत व प्रद्युन्नसिंग रजपूत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हा जाधव ऑफसेट येथे काम करत असताना धारासिंग रजपूत याने प्रदीप याला लोखंडी डोक्यावर मारून जखमी केले.तसेच बांबूने पोटावर मारहाण केली व फिर्यादी यांचे वडील जाब विचारण्यासाठी गेले असता,त्यांना देखील शिवीगाळ करून धमकी दिली व तसेच प्रद्युन्नसिंग रजपुत याने देखील फिर्यादी याला हाताने मारहाण केली.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोसई.तरंगे हे करीत आहेत.

# यंदा जनता प्रस्थापितांना धडा शिकवून परिवर्तन करेल

## अभिजित पाटील; बाईक रॅली काढून अभिजीत पाटील यांचे पांढरेवाडी येथे ग्रामस्थांकडून जोरदार स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ माढा मतदार संघातील पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर, पांढरेवाडी, जाधववाडी, वरवडे, वाफेगाव, वाघोली, लवंग, महाळूंग या गावांना आहे भेट दिली. यावेळी मेंढापूर ते पांढरेवाडी दरम्यान अभिजीत पाटील यांचे बाईक रॅली काढून ग्रामस्थांकडून जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की माझ्या माध्यमातून सर्वसामान्यांचा विकास झाला पाहिजे, त्यांना मदतीचा हात मिळाला पाहिजे हा एकच विचार घेऊन मी आपल्या समोर आलो आहे.

मी सत्ता मिळावी म्हणून आपल्यासमोर उभा नाही तर परिवर्तनासाठी आपल्यासमोर आलो आहे असे आवाहन करत.

ते पुढे बोलताना म्हणाले की प्रदीर्घकाळ सत्तेत राहूनही प्रस्थापितांना माढा मतदार संघातील नागरिकांना साध्या मूलभूत सुविधा पुरविता आल्या नाही हे दुर्दैव आहे. म्हणूनच आदरणीय पवार साहेबांनी माढा मतदार संघातील जनतेच्या मनातील ओळखून या शेतकऱ्याच्या पोराला उमेदवारी दिली आहे. यंदाची निवडणूक आता जनतेनं हाती घेतली आहे. अन्यायी प्रस्थापितांना जनता धडा शिकवत यंदा परिवर्तन घडवून आणायचं हाच जनतेचा निर्धार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अनेक वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना माढ्याचा रखडलेला विकास करण्यासाठी अभिजीत पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन केले.



## कार्तिकी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेची शासकीय महापूजा डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.११) कार्तिक शुध्द प्रबोधनी एकादशी दिवशी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे कार्तिकी यात्रा संपन्न होत असते. या वर्षी सन २०२४ मध्ये कार्तिकी एकादशी मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी माता, या देवतांची राज्याचे उपमुख्यमंत्री व मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक शासकीय महापूजा आयोजित करण्यात येते.



तथापि, राज्याच्या मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्री असल्याने कोणत्या उपमुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पुजा करावी, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. तसेच महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ ची अधिसूचना प्रसिध्द झालेली असून, सदरच्या घोषणेपासून म्हणजेच दिनांक १४ ऑक्टोबर पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, शासनाने केलेल्या मार्गदर्शनानुसार ह्याववर्षीची श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची शासकीय महापूजा शासनाचा प्रतिनिधी म्हणून डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

याशिवाय, शासकीय महापूजेपूर्वी मंदिर समिती मार्फत होणारी श्रीं विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची पाद्यपुजा व नित्यपुजा अनुक्रमे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते संपन्न होत असून, शासकीय महापूजेसाठी कर्तव्यावरील प्रशासकीय अधिकारी व पौरोहित्य करणारे कर्मचारी उपस्थित राहणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

## कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांसाठी उपलब्ध सुविधांची जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक पंढरपूरात येतात. यात्रा कालावधीत येणाऱ्या वारकरी भाविकांना मंदीर समिती तसेच प्रशासनाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या सोयी-सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आज यांनी केली.



यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, उपमुख्याधिकारी सुनील वाळुंजकर तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

पंढरपुरात कार्तिकी एकादशी निमित्त मोठ्या प्रमाणत भाविक दाखल झाले आहेत. भाविकांना सहज आणि सुलभरित्या दर्शन मिळावे यासाठी मंदीर समिती कडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची पाहणी केली. मंदिर समितीकडून दर्शन रांगेत कुलर ,फॅन , पायाखाली मॅट ,मंडपाची व्यवस्था तसेच पोलीस सुरक्षासह वैद्यकीय यंत्रणा लाईव्ह दर्शन व्यवस्था तसेच प्रशासनाकडून भाविकांच्या आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी भक्ती सागर (६५ एकर) येथे वारकरी भाविकांसाठी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सुविधामध्ये शौचालय सुविधा, पाणी पुरवठा सुविधा आरोग्य सुविधा याची पाहणी केली. भाविकांच्या आरोग्य सुरक्षततेसाठी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध ठेवावा. तसेच आपत्कालीन कक्षातील नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबतची वेळोवेळी पाहणी करून. पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध आहेत का नाही याची पाहणी करून तात्काळ सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी जयवंत बोधले महाराज यांनी भक्ती सागर ६५ एकर येथे प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सुविधांबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी प्रशासनाकडून वारकरी भाविकांना देण्यात आलेल्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समितीकडून वारकरी-भाविकांना देण्यात आलेल्या सुविधांची माहिती दिली. तसेच मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी नगरपालिका प्रशासनाकडून ६५ एकर, वाळवंट,पत्राशेड तसेच शहरात आरोग्याच्या दृष्टीने उपलब्ध सुविधा, अतिक्रमण मोहिम, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था आदीबाबत माहिती दिली.

## समविचारी आघाडी व महायुतीचे घटक पक्षातर्फे श्री राम मंगल कार्यालयात मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान दादा अवताडे यांच्या प्रचारार्थ मेळावा समाधान दादा अवताडे प्रशांतराव परिचारक यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांची संवाद साधला निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माहितीच्या विजयाचा उद्दिष्ट आणि भक्कम मोर्चे बांधणी करण्यासाठी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व मेळाव्याच्या निमित्ताने करण्यात आले

माहितीच्या विजयासाठी राबणारा प्रत्येक कार्यकर्ता आणि मथरूपी आशीर्वाद देणारी जनता हे दोन्ही मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाच्या अविभाज्य घटक आहे असे मत समाधान दादा यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केले

त्याचबरोबर मतदार संघात विकास म्हणून भूक धोरण आणखी प्रभावीपणे राबवण्यासाठी आणि महायुतीच्या कल्याणकारी योजना ही सर्वांपर्यंत अविरत पोहोचवण्यासाठी माहितीच्या विजय महत्त्वाचा आहे असं स्पष्ट प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आपल्या मनोगत आतून व्यक्त केले



तसेच मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी समविचारी आघाडी माहितीच्या बाजूने भक्कमपणे उभी असेल असे श्रमविचारी आघाडीने मत व्यक्त केली याप्रसंगी विचार या गाडीचे ज्येष्ठ नेते श्री रामचंद्र भाऊ जगताप भाजपचे शहर अध्यक्ष अंबादास कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्य सरचिटणीस लतीफ भाई तांबोळी, व्यापारी संघटना तालुका अध्यक्ष यांनी आपले मत व्यक्त केले सदर मेळाव्यास प्रसंगी ज्येष्ठ नेते श्री रामचंद्र भाऊ जगताप भाजप तालुका अध्यक्ष अंबादास कुलकर्णी राष्ट्रवादीचे काँग्रेस पार्टी राज्य सरचिटणीस श्री लतीफ भाई तांबोळी व्यापारी संघटना तालुका अध्यक्ष श्री प्रकाश आप्पा गायकवाड माजी संचालक श्री लक्ष्मण तात्या जगताप महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे माजी नगराध्यक्ष श्री विजयकुमार खवतोंडे माजी नगराध्यक्ष पै श्री ज्ञानेश्वर भगरे श्री चंद्रकांत काका पडोळे श्री आप्पासाहेब चोपडे माजी नगरसेवक श्री अजित आप्पा जगताप श्री प्रवीण खवतोंडे श्री महादेव भाऊ जाधव स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हा संघटक, युवराज घुले, श्री सोमनाथ बुर्जी, नजीब भाई इनामदार श्री शिवानंद पाटील श्री बबलू सुतार श्री विकास भगरे श्री किशोर दत्तू श्री अशोक माळी बशीरबाई बागवान आदी मान्यवर समविचारी आघाडीचे कार्यकर्ते महायुतीचे सर्व पदाधिकारी सहकारी कार्यकर्ते मंगळवेढा ग्रामस्थ प्रचंड संख्येने उपस्थित होते.

## मेहकर येथे अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांची विराट सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/मेहकर : मेहकर लोणार मतदार संघाच्या वंचित बहुजन आघाडीच्या अधिकृत उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ अँड बाळासाहेब आंबेडकर यांची विराट सभा संपन्न झाली.

डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ मेहकर येथे आयोजित विराट सभेला अँड बाळासाहेब आंबेडकर यांनी संबोधित केले. आरक्षण हा संविधानाचा आत्मा आहे. आरक्षण संपुष्टात जर आले तर एस सी, एस टी, ओबीसींना शिक्षण, नोकरी मध्ये प्रतिनिधित्व मिळणार नाही. प्रस्थापित सर्वच पक्ष आरक्षण व संविधान विरोधी असुन लोकांना मुर्ख बनवून सत्तेची पोळी भाजत आहेत. ओबिसीचे संपूर्ण आरक्षण धोक्यात तर आहेच परंतु एस सी आरक्षणामध्ये क्रीमीलेअर लाऊन वर्गीकरण करण्यावर सर्वच पक्ष पाठींबा देत आहेत त्यामुळे एकुणच आरक्षण धोक्यात आले असून आरक्षण वाचवायचे असेल तर ओबीसी, आदिवासी, बौद्ध व मुस्लीम यांनी एकत्रितपणे लढून आपल्या आरक्षणाची बाजु मांडणारे उमेदवार विधानसभेत पाठवावे असे आवाहन केले आहे. मेहकर मतदारसंघात डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण ह्या एक उच्च शिक्षीत, युवा, सर्वसामान्य घरातील, कर्तव्य दक्ष व स्थानिक उमेदवार असुन, सर्वसामान्य मानसाच्या हक्क अधिकार व आरक्षणासाठी कणखर उमेदवार असल्याने डॉ सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना निवडून आणण्याचे आवाहन केले आहे.



हि लढाई धनशक्ती विरूद्ध जनशक्ती असून सर्वसामान्य लोक प्रस्थांपितांच्या कागदोपत्री विकासाला कंटाळले असुन आजही मेहकर लोणार मतदारसंघात अनेक गावांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी नाही, अनेक गावामध्ये रस्तेही नाहीत. तिस वर्षापासून सत्तेत असुनही मतदारसंघात रोजगार नाहीत म्हणून यावेळी जनतेला बदल हवा आहे असे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी केले. या सभेला रिसोड मालेगांवचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार प्रा प्रशांत गोळे पाटील , वंचित चे प्रदेशाध्यक्ष मा. फुंडकर साहेब, निलेश जाधव , महेंद्र पनाड, ड. बबनराव वानखेडे , दिलीप राठोड , मोबिन शाह , प्रा शेजुळ साहेब , सूत्रसंचालन प्रा कृष्णा पाटील इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन आबाराव वाघ यांनी केले .

**तुळजापूर शहरात महायुतीचे रेकॉर्ड ब्रेक शक्ती प्रदर्शन**

**राणा पाटील यांचे प्रतिपादन**

## तुळजापूर नळदुर्गसह तालुक्याचा विकास झाला पाहिजे हेच ध्येय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा तुळजापूर नळदुर्ग सह तालुक्याचा कायापालट हेच आपले ध्येय आहे. जगदंबेच्या आशीर्वादाने मागील पाच वर्षांत तुळजापूर मतदारसंघाची सेवा करण्याचे भाग्य लाभले. तीर्थक्षेत्र तुळजापूर रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर नोंदविता आले.

जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन तुळजापूर शहरात विकसित करण्यासाठी दोन हजार कोटी रूपयांचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. रोजगार निर्मितीकडे आपले विशेष लक्ष आहे. तुळजापूरचा कायापालट होत आहे. जिल्ह्याचाही सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आणि सोबत महत्वपूर्ण असल्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले .

तुळजाभवानी मंदिरासह परिसरात विकासकामे करून, पर्यटक व भाविकांच्या संख्येत दुपटीने वाढ होण्यासाठी आवश्यक ती विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापार्यांना आणखी पर्यायी व्यवसाय करून आपले उत्पन्न दुपटीने वाढविता येणार आहे. तुळजापूरकरांना विश्वासात घेवूनच सर्व विकासकामे करायचे आहेत. ठाकरे सरकारने रेल्वे प्रकल्पासाठी एक रूपयाही दिला नाही, अडीच वर्षे काम थांबले होते. त्यासाठी आपण परिवहन मंत्र्यांवर हक्कभंग आणला. शेवटी साडेचारशे कोटी रूपयांचा निधी महायुती सरकारनेच उपलब्ध करून दिला आणि रेल्वेमार्गाचे काम चालू झाले. केंद्र सरकारच्या प्रशाद योजनेसाठी तीर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास



आराखडा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पाठवावा, यासाठी आपण पाठपुरावा केला होता. मात्र ठाकरे सरकारने ऐकले नाही. शेतकर्यांना कर्जमाफी, वीजबिल माफी महायुती सरकारनेच दिली. मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले, लाडक्या बहिणींना महिन्याला दीड हजार रूपये लाभाची योजना सुरू केली. त्यामुळे विरोधकांना अडीच वर्षात महायुती सरकारने काय केले, हे विचारण्याचा नैतीक अधिकार राहिला नाही. नळदुर्गला बसवसृष्टी उभारली जात आहे, तुळजापुरात अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक, बौध्द विहार, शादीखान्याचे भूमिपूजन केले. हा फक्त विकासाचा ट्रेलर आहे. विकासाचा पिक्चर अजून बाकी आहे आणि त्यासाठी सर्वांची साथ हवी असल्याचे मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.